# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दूरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.रासाप्रपक / कृषीप्र-१३२१/शै.व. २१-२२/२२५३ दि. २४ डिसेंबर,२०२१

**परिपत्रक**

**विषयः- कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०२१-२२. पदवी अभ्यासक्रमांतर्गत वाढीव जागा विचारात घेऊन जागेवरील प्रवेश फेरी व संस्थात्मक कोटयातील प्रवेशाचे सुधारीत वेळापत्रक.**

संदर्भः- महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण-२/१३२१/२५९८, दि. २४/१२/२०२१

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार निश्चित केलेल्या निकषास सहसचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय यांचे पत्र जा.क्र.मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.९/१२/२०२१ अन्वये शासनाने मान्यता दिलेली आहे. यामुळे महाविद्यालयांच्या **प्रवेश क्षमतेत ५८७ ने वाढ होत आहे.** सदर वाढीव जागा 'जागेवरील प्रवेश फेरी'द्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. 'जागेवरील प्रवेश फेरी'साठी उपलब्ध जागांचा तपशिल नियोजित वेळापत्रकानुसार दि.२४/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारांनी प्रवेश रद्द केल्यास त्यात्यावेळी सदरच्या रिक्त जागांचा तपशील अद्ययावत होणार आहे.

**प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट 'आय' नुसार राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले** (not admitted) **उमेदवार जागेवरील प्रवेश फेरीकरिता पात्र आहेत.**

नियोजित वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्या राबविण्यात आलेल्या असून या प्रवेश वाटप फेऱ्यांद्वारे प्रवेशित उमेदवारांना जागेवरील प्रवेश फेरीमध्ये सहभागी व्हावयाचे असल्यास त्यांनी घेतलेला प्रवेश संबंधित महाविद्यालयात जावून रद्द करणे अनिवार्य आहे. अशाप्रकरणी प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र.४.१७ नुसार महाविद्यालयांनी उमेदवारांच्या इच्छेनुसार प्रवेश रद्द करण्याबाबतची कार्यवाही विनाविलंब करून त्यानुसार महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे नोंद घ्यावी. प्रवेश रद्द करण्यास उमेदवारांना पुरेसा अवधी उपलब्ध व्हावा म्हणून

जागेवरील प्रवेश फेरी आणि संस्थास्तरीय कोटयातील जागा भरण्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>कार्यक्रम</th><th>सध्याचा दिनांक</th><th>सुधारीत दिनांक</th></tr>
<tr><td>१.</td><td>रिक्त जागांकरिता 'जागेवर प्रवेश फेरी' (प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट 'जी' मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा'वर व सोबतच्या परिशिष्टातील कार्यपध्दतीनुसार)
<table>
<tr><th>दिनांक</th><th>अंतिम गुणवत्ता यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारासह)</th></tr>
<tr><td>०३/०१/२०२२</td><td>८० व त्यापेक्षा अधिक</td></tr>
<tr><td>०४/०१/२०२२</td><td>६० व त्यापेक्षा अधिक</td></tr>
<tr><td>०५/०१/२०२२</td><td>सर्व पात्र उमेदवार.</td></tr>
<tr><td>०६/०१/२०२२</td><td>सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह)</td></tr>
</table></td><td>२७/१२/२०२१ ते ३०/१२/२०२१</td><td>०३/०१/२०२२ ते ०६/०१/२०२२</td></tr>
<tr><td>२.</td><td>संस्थास्तरीय कोटयातील जागा भरण्याचे वेळापत्रक</td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>(i) संबंधित संस्था / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर महाविद्यालयनिहाय उपलब्ध जागांची प्रसिध्दी</td><td>२८/१२/२०२१</td><td>०४/०१/२०२२</td></tr>
<tr><td></td><td>(ii) संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे व्यक्तीशः प्रवेशाकरिता अर्ज दाखल करण्याचा कालावधी (अर्जकर्ता उमेदवार अंतिम गुणवत्ता यादीतील असावा)</td><td>३०/१२/२०२१ व ३१/१२/२०२१ (सायं.५.३० पर्यंत)</td><td>०६/०१/२०२२ व ०७/०१/२०२२ (सायं.६.३० पर्यंत)</td></tr>
<tr><td></td><td>(iii) संबंधित संस्थेच्या / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर गुणवत्ता यादी / निवड यादीची प्रसिध्दी.</td><td>०३/०१/२०२२ (सायं.५.३० पर्यंत)</td><td>०८/०१/२०२२ (सायं.६.३० पर्यंत)</td></tr>
<tr><td></td><td>(iv) निवड यादीतील उमेदवारांनी प्रवेश घेण्यासाठी, संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे मूळ कागदपत्रे व आवश्यकत्या शुल्काच्या धनाकर्षासह उपस्थित राहण्याचा कालावधी</td><td>०५/०१/२०२२ ते ०७/०१/२०२२ (सायं.५.३० पर्यंत)</td><td>१०/०१/२०२२ ते १२/०१/२०२२ (सायं.६.३० पर्यंत)</td></tr>
</table>

| अ.क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| | (v) निवड यादीतील उमेदवार विहित कालावधीमध्ये उपस्थित नसल्यास, रिक्त असणाऱ्या जागा वरील क्र. (iii) येथील गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेने भरण्याचा कालावधी. तसेच जागा स्वीकृती शुल्क रु.१०००/- प्रती विद्यार्थी लॉगइनद्वारे राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यात जमा करण्याचा कालावधी. | ०९/०१/२०२२ ते ११/०१/२०२२ | १४/०१/२०२२ ते १७/०१/२०२२ |
| ३. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २७/१२/२०२१ | ०३/०१/२०२२ |
| ४. | प्रवेश प्रक्रियेसाठीचा अंतिम दिनांक | २०/०१/२०२२ | २०/०१/२०२२ |

**जागेवरील प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय नाहीत,** याची कृपया सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(रविंद्र जगताप)भा.प्र.से.
आयुक्त,
**राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत माहितीसाठीः-

महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे